महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०१ वा | दिनांक : २९/०९/२०२५ | वार : सोमवार

# नाशिकमधील पूरस्थितीवर छगन भुजबळ ॲक्शन मोडवर



**नाशिक :** जिल्ह्यातील पूर स्थितीवर प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवून नागरिकांच्या सुरक्षेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, तहसील, पोलिस स्टेशन कार्यालयात तातडीने नियंत्रण कक्ष सुरू करण्यात यावे. पूर परिस्थितीत अडकलेले नागरिक तसेच जनावरे सुरक्षित स्थळी हलवावे, असे निर्देश राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना दूरध्वनी द्वारे दिले आहेत.

छगन भुजबळ यांनी नाशिक जिल्ह्यात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आपला मुंबई दौरा रद्द करत येवला मतदारसंघात पूरग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी रवाना झाले आहेत. यावेळी त्यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना दूरध्वनीद्वारे संपर्क करत जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहे.

मंत्री छगन भुजबळ हे नाशिक जिल्ह्याच्या पूर परिस्थितीवर लक्ष ठेऊन असून त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद, पोलीस स्टेशन पंचायत समिती सर्व ठिकाणी तत्काळ नियंत्रण कक्ष सुरू करावा, अशा सूचना केल्या आहेत. तसेच मदत कक्षाचे दूरध्वनी क्रमांक सोशल मिडिया तसेच वर्तमानपत्रात जनतेसाठी तात्काळ प्रसिद्ध करावेत पूर परिस्थितीत काही तात्पुरती बेटे निर्माण झालेली आहे. अशा ठिकाणी अडकलेल्या व्यक्तींना तात्काळ सुटका करावीत. आवश्यक त्या ठिकाणी एनडीआरएफ किंवा एसडीआरएफ पथकांची मदत घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत.

तसेच पूरग्रस्त भागात बेघर झालेल्या कुटुंबांना शासनाने जाहीर केल्याप्रमाणे मोफत धान्य तसेच मदतीची रक्कम तात्काळ वाटप सुरू करावे. पूर परिस्थितीने बाधित झालेल्या कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी तात्काळ स्थलांतरित करावे. ज्या ठिकाणी जीवित हानी पशुहानी झालेली आहे, त्या ठिकाणी तात्काळ मदत देण्याची कार्यवाही सुरू करावी जखमी व्यक्तींना सुद्धा सुरक्षित ठिकाणी हलवावे, अशा सूचना केल्या आहे.

# संकटाच्या काळात सरकार मदत करताना दिसत नाही : जयंत पाटील



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून मराठवाडा, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांत सुरू असलेल्या अतिवृष्टीने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. यामुळे नद्यांना महापूर येऊन शेतीचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये मोठी भर पडली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी राज्यपालांना पत्र लिहून महाराष्ट्र विधानमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे.

अतिवृष्टीमुळे बीड आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी जनावरांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. तसेच, शेतातील उभी पिके पाण्याखाली गेली असून, जमिनीची सुपीक मातीही वाहून गेली आहे. यामुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला असून, सरकारने तातडीने मदत जाहीर करावी अशी मागणी सर्वत्र होत आहे. राज्यातील या गंभीर परिस्थितीची दखल घेत जयंत पाटील यांनी राज्यपालांना एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा सविस्तर उल्लेख करत शेतकऱ्यांना तातडीने मदत पोहोचवण्याची मागणी केली आहे.

यावर्षी राज्यभरात पावसाने थैमान घातले आहे. मागील आठवड्याभरापासून तर पावसाचा जोर अधिकच वाढला आहे. ओढे नाले दुथडी भरून वाहत आहेत. शेतीचा चिखल झाला आहे, शेतकऱ्यांची जनावरे दगावली आहेत, पूरग्रस्त भागात अनेक लोक अडकले आहेत, तर काही लोकांनी जीव गमावला आहे. संपूर्ण राज्यात हाहाकार माजला आहे.

मी मागील काही दिवसांपासून अतिवृष्टी आणि पूरामुळे बाधित झालेल्या गावांना प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी करत आहे. शेतकऱ्यांवर मोठा बिकट काळ ओढावला आहे. पूराच्या पाण्यामुळे फक्त पिकं नष्ट झाली असे नाही तर शेतकऱ्यांची जमीनही खरडून वाहून गेली आहे. नुकसान इतके झाले आहे की शेतकरी वर्षभर राबला तरी परिस्थिती स्थिरस्थावर होणार नाही असे दिसते.

अशा संकटाच्या काळात सरकारने भरीव मदत करणे गरजेचे आहे. पण सरकार असे करताना दिसत नाही. महोदय, हे काही योग्य नाही. त्यामुळे या विषयावर सविस्तर चर्चा व्हावी व तात्काळ निर्णय व्हावा यासाठी महाराष्ट्र विधानमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे अशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने विनंती करीत आहे, असे पत्रात म्हटले आहे.

# वंचितची युतीसाठी तयारी, पण काँग्रेसचा प्रतिसाद नाही : प्रकाश आंबेडकर

**मुंबई :** राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांव्यतिरिक्त इतर कोणत्याही पक्षासोबत युती करण्याची आपली तयारी असल्याची घोषणा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काही महिन्यांपूर्वी केली होती. मात्र, काँग्रेस आणि इतर कोणत्याही पक्षाने अद्याप युतीसाठी संपर्क साधलेला नसल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले आहे. भाजपने काँग्रेसला वंचित बहुजन आघाडीशी युती करू नये, असे सांगितले आहे का? अशी शंका प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली आहे.

वंचित बहुजन आघाडीने आतापर्यंत अनेक निवडणुकांमध्ये स्वतंत्र लढण्याची भूमिका घेतली आहे. मात्र, राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपविरोधात एकत्र येण्याची तयारी प्रकाश आंबेडकर यांनी वारंवार दर्शवली आहे. त्यावरही काँग्रेसकडून ठोस प्रतिसाद न मिळाल्याने आंबेडकरांनी आता थेट प्रश्न उपस्थित करून काँग्रेसच्या भूमिकेवर टीका केली आहे. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, काही प्रश्न उपस्थित केले आहेत.

प्रकाश आंबेडकरांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजप आणि त्याचे मित्रपक्ष सोडून इतर पक्षांसोबत युती करायला आम्ही तयार आहोत! हे मी २१ मे रोजी सांगितले होते आणि माझी पत्नी अंजली आंबेडकर यांनी सुद्धा १८ जून रोजी तेच सांगितले होते. पण, आजपर्यंत काँग्रेस किंवा इतर कोणत्याही पक्षाने वंचित बहुजन आघाडीशी युतीसाठी संपर्क साधलेला नाही!

प्रकाश आंबेडकर यांनी संशय व्यक्त करत थेट भाजपवर निशाणा साधला आहे. भाजपने काँग्रेसला वंचित बहुजन आघाडीशी युती करू नये, असे सांगितले आहे का? असा थेट सवाल त्यांनी विचारला. तसेच भाजपकडे काँग्रेसविषयी असं काय आहे, ज्यामुळे काँग्रेस भाजपला घाबरत आहे? असाही सवाल वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ सप्टेंबर २०२५


## खुलताबाद तालुक्यातील निरगुडी ठाकरवाडी पिंपरी तिसगाव या भागांत जोरदार पाऊस



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** मराठवाड्यातील सर्व आठ जिल्ह्यांसाठी भारतीय हवामान विभागाने (IMD) रेड अलर्ट जारी केला होता.

या दोन दिवसात मराठवाड्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती तसेच शेतकऱ्यांसह नागरिकांनी सतर्क राहण्याची आव्हान प्रशासनाने केले आहे

खुलताबाद तालुक्यातील निरगुडी ठाकरवाडी पिंपरी तिसगाव या परिसरात मुसळधार पाऊस कोसळला आहे या भागात पावसाने हाहाकार माजवला आहे मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची दैना उडाली आहे रविवारी विजेच्या कडकडाटासह जोरदार अवकाळी पाऊस पडला.

या परतीच्या अवकाळी पावसामुळे शेतात मोडून ठेवलेल्या काही शेतकऱ्यांच्या मक्का बाजरी पाण्याखाली जाऊन त्यांची नासाडी झाली आहे तर काही मक्काच्या शेतातून गुडघे इतका ले पाणी साचून मक्का सडत चालली आहे नद्या नाले दुथडी भरून वाहत आहेत काही शेतकऱ्यांचे बांध बंधारे फुटून गेले आहेत.

तरी तालुक्याचे तहसीलदार यांनी जास्त पाऊस पडलेल्या ठिकाणी व पुर आलेल्या ठिकाणी जावू नये नदी नाले ओढ्याच्या किनारी जे रहिवासी आहेत त्यांनी तात्काळ घरातून स्थलांतरित व्हावे आणी सुरक्षित ठिकाणी रहावे आपली जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत आजून काही दिवस रेड अलर्ट चालू राहणार आहे त्यामुळे सर्वांनी दक्षता घ्यावी असे जनतेला आवाहन करण्यात आले आहे.






## हिंदी दिवस पंधरवड्यात आंतरशालेय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव






**छत्रपती संभाजीनगर :** स्थानिक शहागंज येथील महाराष्ट्र हिंदी विद्यालयात हिंदी दिवस पंधरवाडा समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण, भव्यदिव्य आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला. या सोहळ्याचे आयोजन महाराष्ट्र हिंदी विद्यालय, महाराष्ट्र हिंदी प्रचार सभा तसेच महाराष्ट्र हिंदी ग्रंथालय व वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यावर्धक समिती, हिंदी प्रचार सभा हैदराबादचे अध्यक्ष व अखिल भारतीय हिंदी संस्था संघ नवी दिल्लीचे उपाध्यक्ष डॉ. चंद्रदेव कवडे यांनी भूषविले.

व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष व हिंदी प्रचार सभा हैदराबादचे परीक्षा मंत्री प्रा.सुरेश पुरी, संस्थेचे सचिव व महाराष्ट्र हिंदी प्रचार सभा आणि महाराष्ट्र हिंदी ग्रंथालय तथा वाचनालयाचे मंत्री डॉ. नारायण वाकळे, प्रमुख वक्ते मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा, महाविद्यालयाचे प्राचार्य हसन इनामदार, महाराष्ट्र हिंदी प्रचार सभा शहागंज चे अध्यक्ष सुनीता वाघमारे, रीना राऊत, सय्यद रईसा बेगम, विजय रानभरे, फहीम शेख, कृष्णा गोरे, मुख्याध्यापक रवींद्र तायडे, किरण पवार तसेच पर्यवेक्षक योगेश्वर निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख अतिथींचा परिचय सोनाली देसले यांनी करून दिला.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक रवींद्र तायडे यांनी शाळेत व हिंदी प्रचार सभा आणि महाराष्ट्र हिंदी ग्रंथालय तथा वाचनालयात चालणाऱ्या विविध उपक्रमाविषयी उपस्थितांना माहिती दिली.स्वागत गीताच्या सुरांनी वातावरण अगदी भारावून गेले.यानंतर आंतरशालेय वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

विजेत्यांना रोख रक्कम, स्मृतिचिन्हे आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.▪वक्तृत्व स्पर्धा निकाल:प्रथम : लिबान ईबाद खान (लिटल फ्लॉवर हायस्कूल)द्वितीय : कु.अद्विता अजिंक्य कुलकर्णी (शारदा मंदिर प्रशाला)तृतीय : कु.वैष्णवी अनिल भवर (माऊंट व्हॅली टेक्नो स्कूल) व कु.तन्वी भानुदास कळम (सिद्धेश्वर हायस्कूल, सिल्लोड)उत्तेजनार्थ : जुनेद आसिफ पठाण (महाराष्ट्र हिंदी विद्यालय) वकु.वानिया फिरोज अहेमद (रेजिमेंटल हायस्कूल)▪वादविवाद स्पर्धा – मुलांचा गट:प्रथम : शेख अरहान रऊफ (सेंट फ्रान्सिस डिसेल्स स्कूल)द्वितीय : सय्यद अबरार सय्यद हारूण (महाराष्ट्र हिंदी विद्यालय) तृतीय : राज भीमराव गायकवाड (मिलिंद मल्टीपर्पज स्कूल) उत्तेजनार्थ : यश राजेश पिल्ले (मोईनुल उलूम स्कूल)वादविवाद स्पर्धा – मुलींचा गट:प्रथम : कु.अनुष्का दिलीप बोराडे (जागृती हायस्कूल)द्वितीय :कु. मयुरी ज्ञानेश्वर गावंडे (माऊंट व्हॅली टेक्नो स्कूल)तृतीय : कु.दिव्या कमलाकर लोखंडे (भगवान विद्यालय) उत्तेजनार्थ : कु.करुणा बाबासाहेब केदारे (मोईनुल उलूम स्कूल)प्रमुख वक्ते प्राचार्य हसन इनामदार यांनी मातृभाषेत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

“भाषण केल्यामुळेच मला नवी ओळख मिळाली. आपल्या कलांचा विकास करून, पुस्तकांना मित्र बनवून, आई-वडील व गुरुजनांचा सन्मान करूनच यश संपादन करता येते,” असे त्यांनी सांगितले. तसेच शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास व हिंदी विषयात अव्वल येणाऱ्यास डॉ. चंद्रदेव कवडे यांच्या नावाने रोख १००१ रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले.

अध्यक्षीय समारोपात डॉ.चंद्रदेव कवडे यांनी हिंदीचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले व विजेत्यांचे कौतुक करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन शुभांगी दसपुते व सुनीता गुंजाळ यांनी केले. आभारप्रदर्शन साहेबराव पाटील यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या हिंदी विभाग समितीतील सर्व सदस्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ सप्टेंबर २०२५


## दौलताबाद किल्ल्याची भिंत कोसळली सुदेवाने जीवित हानी टळली



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दौलताबाद किल्ल्यावर भिंत कोसळली सुदेवाने जीवित हानी टळली दोन दिवसापासून जोरदार पावस असल्यामुळे रात्री देवगिरी किल्ल्याची रस्त्याची भिंत कोसळली शनिवारी संध्याकाळी चार वाजेपासून सुरू झालेल्या पावसाने दौलताबाद परिसराला रात्रभर झोडपले या पावसामुळे दौलताबाद (देवगिरी) किल्याची किल्याची गणपती मंदिराच्या शेजारी भिंत रात्री कोसळली सुदेवाने ही भिंत रात्री कोसळली.

यामुळे कोणत्याही प्रकारची हानी झाली नाही रविवारी सकाळी किल्ला कर्मचाऱ्यांनी दगड माती बाजूला करून रस्ता मोकळा पूर्ववत करण्यात आले आहेदौलताबाद परिसरात शनिवारी संध्याकाळी चार वाजेपासून सुरू झालेला पाऊस रात्रभर धो धो कोसळला.

त्यामुळे देवगिरी किल्ल्यावर वरच्या भागात भुयारी मार्गावर लोखंडी तवा असून पुढे गणपती मंदिराजवळ पाच फूट उंच अशी भिंत असून ती दीड मीटर पर्यंत कोसळली.

यामुळे किल्याच्या सर्वात वरचा भाग बारा दरीकडे कडे जाणारा मार्ग बंद झाला ही भिंत रात्री कोसळल्यामुळे कोणते जीवित हानी झाली नाही माहिती मिळताच संवर्धक सहाय्यक अधीक्षक संजय रोहनकर,निलेश कोळी यांनी किल्ला कर्मचारी आर.डी घाटे,आसाराम काळे,शेख हमीद,सय्यद अफरोज,अनिल, विशाल, अलीम पठाण,अनिकेत यांना सोबत घेऊन रस्त्यावर पडलेला मलबा बाजूला करून रस्ता मोकळा केला.

# यशवंत नवरात्र महोत्सव मुरुम हर्षो उल्हासात साजरा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : संपूर्ण भारत भर नवरात्र उत्सव हर्ष उल्हासात साजरा होत असताना अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झालेली आहे . शेतकऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत . अनेक संसार ,घरदार , शेती याचे नुकसान झालेले आहे . या सर्व पूरग्रस्तांसाठी यशवंत नवरात्र महिला मंडळां ने सप्तशती पाठाचे पठण आयोजन केले होते

. या पठणातून देवीला प्रार्थना करण्यात आली . हे जे मराठवाड्यावर संकट आलेल आहे ते लवकर दूर व्हावे आणि शेतकरी बांधव तसेच पूरग्रस्त यांना या सर्व संकट परिस्थितीत त्यांचे मनोबल कायम ठेवून या संकटातून लवकरात लवकर सोडवावे . यासाठी सप्तशती पठनातून देवीची विनवणी करण्यात आली.

या सप्तशती पठण करण्यात प्रा. विजया बेलकेरी, सौ.सुरेखा घोडके, सौ.सोनाली घोडके, सौ.संगीता देशमाने मॅडम, सौ.सविता गाडेकर, सौं.अंजु मोटे,सौ. प्रियंका चव्हाण,सौ.सविता जाधव,सौ. कविता जाधव,सौ.सरोजा पाटील, सौ.मिना टाचले ,सौ.पद्मा टाचले, सौ.प्रियंका राजपुत,सौ, निर्मला बोगरगे,सौ.सिमा अष्टगी,सौ, सविता धर्माधिकारी, सौ.सारिका लोहार, सौ.ञिगुळे, सौ.तांबडे या मंडळीनी सहभाग घेतला.

या नवराञ मोहत्सवात दररोज आराधी मंडळी यांचे कार्यक्रम, सांस्कृतिक खेळात कलर बलून जंप, संगीत खुर्ची, दोरी उड्या,गरबा नृत्य इत्यादी खेळांचा समावेश व तसेच महिलांसाठी सप्त शती, कुंकुम अर्चन अशा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.तसेच दररोज भाविकासाठी देवीची साडी चोळीने ओटी भरुन मोठ्या भक्ती भावाने पुजा करुन नंतर प्रसादाचे वाटप केले जाते.या नवराञ मोहत्सव यशस्वी पणे पार पाडण्यासाठी अमोल पालपुरे, तेजस निलवाडे, श्रीधर निलवाडे, संजय सुरवसे,गौरीशंकर बोंगरगे,चेतन कंटे, धनपाल चौव्हाण, शुभम चौव्हाण, अनिकेत पाटील, निरज पडलवार, निशांत पडलवार, मानव चव्हाण, सोमनाथ जाधव, ओंकार सुरवसे, प्रितेश राठोड, श्रेयश चव्हाण उदय घैसास, ओंकार कुंभार, सतीश कुंभार या नवराञ मोहोत्सव पदाधिका-यांचा व यशवंत नगर मधील महिला भाविकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे.









## दौलताबाद परिसरात १५ तास जोरदार पाऊस

**दौलताबाद (जावेद अहेमद)** : शनिवारी सायंकाळी ४ वाजे पासून रविवारी सकाळी ७ वाजे पर्यंत पावसाने दौलताबाद परिसरात तुफान बसला.

दौलताबाद परिसरात दौलताबाद, अब्दीमंडी,रामपुरी, रामपुरी तांडा, केसापुरी, केसापुरी तांडा, फतीयाबाद, माळीवाडा, वंजारवाडी, शरणापुर, फतीयाबाद येथे शनिवारी सायंकाळी चार वाजे पासून सुरू झालेला पाऊस रविवारी सकाळी ७ वाजेपर्यंत तुफान पाऊस पडलाया पावसामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक घरात, दुकानात पाणी शिरले तर अनेक घरांची पडझड झाली.

यात दौलताबाद येथील शेख एजाज,सय्यद समद माळीवाडा येथील सुरेंद्र जगधने, फतीयाबाद येथील शेख अलिमोदिन ,यांच्या घराच्या भिंती कोसळल्या असून सुद्यवाने जीवित हानी झाली नाही.जांभळा येथे दगडू वाचू केराई यांची घराची भिंत कोसळला आहे तर रविवारी बाजारात विदयुत तर कोसळली सुदेवाने कोणत्याही प्रकारची हानी झाली नाही ही तार दुकानाच्या वर लावलेल्या ताडपत्री वर पडल्याने हानी झाली नाही भीमराज बर्डे यांच्या इलेक्ट्रिक दुरुस्ती च्या दुकानात पाणी शिरल्याने नुकसान झाले आहे बाजूला राजिक कुरेशी यांच्या दुकानात पाणी शिरले होते तर रस्त्यावर खुप पाणी तुंबले होते या मुळे त्रास सहन करावा लागला

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ सप्टेंबर २०२५

# जागतिक हृदय दिन : हृदय आरोग्य आणि जीवनशैलीचे सामाजिक प्रतिबिंब

हृदय हे शरीराचा सर्वात महत्त्वाचा अवयव आहे. ते केवळ रक्तपुरवठ्याचे केंद्र नाही, तर आपल्या जीवनाचे प्रतीक आणि आपल्या शारीरिक, मानसिक व सामाजिक स्वास्थ्याचे मूळ आहे. हृदयाच्या कार्यात लक्षणीय बिघाड होणे म्हणजे फक्त वैयक्तिक आरोग्यावर परिणाम होणे नाही, तर त्याचा परिणाम कुटुंब, समाज आणि देशाच्या सामाजिक व आर्थिक जीवनावरही होतो. आजच्या आधुनिक जीवनशैलीत अनियमित आहार, व्यायामाचा अभाव, तणाव, धूम्रपान आणि मद्यपान यामुळे हृदयरोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. या परिस्थितीत हृदय आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे ठरते. जागतिक हृदय दिन, जो दरवर्षी 29 सप्टेंबरला साजरा केला जातो, हा दिवस हृदयरोग प्रतिबंध, जीवनशैलीतील सुधारणा आणि सामाजिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी समर्पित आहे. 2025 मध्ये हा दिवस “Don’t Miss a Beat” (एकही क्षण चुकवू नका) या थीमसह साजरा केला जात आहे, ज्याचा उद्देश हृदयाचे आरोग्य टिकवणे आणि वेळेवर उपचार घेण्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

जागतिक हृदय दिनाची सुरूवात 2000 साली वर्ल्ड हार्ट फेडरेशन (WHF) आणि जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांच्या संयुक्त प्रयत्नांनी झाली. या दिवसाच्या माध्यमातून हृदयरोगांविषयी जनजागृती निर्माण करणे, लोकांना हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी आवश्यक जीवनशैली अवलंबण्यास प्रोत्साहित करणे आणि वेळेवर वैद्यकीय तपासण्या करण्याचे महत्त्व सांगणे हे उद्दिष्ट आहे. प्रत्येक वर्षी या दिवसासाठी विशिष्ट थीम निश्चित केली जाते, ज्यातून त्या वर्षीच्या सामाजिक आरोग्य संदेशावर भर दिला जातो.

या वर्षीची थीम “Don’t Miss a Beat” (एकही क्षण चुकवू नका) अत्यंत प्रभावी आणि विचारप्रवर्तक आहे. हृदयरोगामुळे अनेक कुटुंबे आपल्या प्रियजनांना गमावतात, ज्याचा मानसिक, आर्थिक आणि सामाजिक स्तरावर गंभीर परिणाम होतो. या थीमद्वारे लोकांना हृदयाचे लक्षण ओळखण्याचे, नियमित तपासण्या करण्याचे, योग्य आहार व व्यायाम करण्याचे आणि मानसिक ताण कमी करण्याचे संदेश दिले जात आहेत. सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने हृदयरोग प्रतिबंधित केल्यास केवळ वैयक्तिक जीवन सुधारते असे नाही, तर समाजातील कार्यक्षमतेत वाढ होते, आर्थिक स्थैर्य टिकते आणि कुटुंबीयांचे कल्याणही सुनिश्चित होते.

जागतिक स्तरावर हृदयरोग हे मृत्यूचे प्रमुख कारण मानले जाते. दरवर्षी 20.5 दशलक्ष लोक हृदयरोगांमुळे मृत्यूमुखी पडतात, जे जागतिक मृत्यूंच्या तिसऱ्या भागापेक्षा जास्त आहेत. तथापि, योग्य जीवनशैली अवलंबल्यास आणि वेळेवर वैद्यकीय तपासण्या केल्यास सुमारे 80% हृदयरोग प्रतिबंध करता येऊ शकतात. भारतात हृदयरोगांचा प्रादुर्भाव चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांमध्ये हृदयरोगांचा धोका वाढला असून विशेषतः 25 ते 50 वयोगटातील तरुणांमध्ये या आजाराचे प्रमाण वाढले आहे. यामागे अयोग्य आहार, जंक फूडचा अधिक प्रमाणात वापर, व्यायामाचा अभाव, तणाव आणि धूम्रपान-मद्यपान यांसारखी जीवनशैलीशी संबंधित कारणे आहेत. महिलांमध्ये हृदयरोगाचे प्रमाण कमी असल्याचे जाणवत असले तरी, आधुनिक जीवनशैलीमुळे त्यांच्यातही हृदयरोगांचा धोका वाढला आहे.

हृदयाचे आरोग्य हा फक्त वैयक्तिक प्रश्न नाही, तर तो सामाजिक आरोग्याशी थेट संबंधित आहे. निरोगी व्यक्ती आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी कार्यक्षम असते. हृदयरोगामुळे एखाद्या व्यक्तीचे मानसिक, शारीरिक आणि आर्थिक जीवन प्रभावित होते, ज्यामुळे कुटुंबात तणाव निर्माण होतो, कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता कमी होते आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हृदयरोग प्रतिबंध म्हणजे सामाजिक स्थैर्य टिकवणे, आरोग्य सेवा वापरण्याचा भार कमी करणे आणि समाजातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा करणे होय.

हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल करणे आवश्यक आहे. त्यामध्ये संतुलित आहार, ज्यामध्ये ताज्या भाज्या, फळे, संपूर्ण धान्ये, कमी साखर आणि कमी फॅट असलेले पदार्थ यांचा समावेश असतो, तो हृदयासाठी उपयुक्त ठरतो. दररोज किमान 30 मिनिटे व्यायाम करणे, चालणे, धावणे, योगा किंवा नृत्य यांसारख्या क्रियांचा समावेश करणे, यामुळे हृदयाचे कार्य सुधारते आणि रक्ताभिसरण सुसंगत राहते. तणाव व्यवस्थापनासाठी ध्यान, योगा आणि श्वासोच्छ्वासाचे तंत्र वापरणे फायदेशीर ठरते. धूम्रपान आणि मद्यपान टाळणे हृदयरोग प्रतिबंधासाठी अत्यावश्यक आहे. तसेच, रक्तदाब, कोलेस्ट्रॉल आणि इतर आरोग्य घटकांची नियमित तपासणी करणे गरजेचे आहे. या सर्व उपायांनी व्यक्तीचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य सुधारते, आणि समाजात आरोग्याची जागरूकता वाढते.

जागतिक हृदय दिनानिमित्त भारतभर विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. वॉकथॉन, हृदय आरोग्य शिबिरे, व्यायाम कार्यशाळा, योगा शिबिरे आणि आरोग्य तपासणी शिबिरे या उपक्रमांमुळे लोकांमध्ये हृदयाचे महत्त्व समजते. वेगवेगळ्या शहरांमध्ये आयोजित वॉकथॉनमध्ये हजारो लोक सहभागी होतात, ज्यात कुटुंब, मित्र आणि विद्यार्थी सहभागी होऊन हृदय आरोग्याबाबत माहिती मिळवतात. वेगवेगळ्या शहरांमध्ये ‘Green Fit Marathon’ आयोजित करून हृदय आरोग्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जातो. या उपक्रमांमुळे समाजात आरोग्याबाबत जागरूकता वाढते, लोकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडतात आणि सामाजिक सहकार्य दृढ होते.

जागतिक हृदय दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नाही, तर तो हृदयाच्या आरोग्यासाठी जागतिक चळवळ आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर, हा दिवस कुटुंबीय, समाज आणि व्यापक सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी एक संधी आहे. “Don’t Miss a Beat” (एकही क्षण चुकवू नका) या थीमद्वारे लोकांना हृदयाच्या आरोग्याबद्दल जागरूकता, जीवनशैलीत सकारात्मक बदल आणि नियमित आरोग्य तपासणी करण्याची प्रेरणा मिळते. हृदयाचे आरोग्य राखणे म्हणजे केवळ वैयक्तिक कल्याण नाही, तर सामाजिक स्थैर्य आणि समाजातील आर्थिक व भावनिक संतुलन टिकवणे देखील आहे. चला, आपण सर्वजण एकत्र येऊन हृदयरोग प्रतिबंधासाठी प्रयत्न करूया, जेणेकरून आपले आणि आपल्या समाजाचे जीवन निरोगी, आनंदी आणि समृद्ध राहील.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ सप्टेंबर २०२५

# आश्वासन ते अंमलबजावणी : सामाजिक न्याय आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव




२०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून, राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांनी, विशेषत: काँग्रेस पक्षाने, त्यांच्या राजकीय धोरणांमध्ये सामाजिक न्याय या विषयाला अधिक महत्व दिले आहे. सर्वसमावेशक शासनाच्या घटनात्मक आदर्शांद्वारे सक्षमीकरणाचे आश्वासन दिले आहे. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू असल्याने, पुन्हा एकदा सामाजिक न्यायाचा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे. यामध्ये सत्ताधारी राजकीय वर्गावर सामाजिक न्याय धोरणांची अंमलबजावणी न केल्याबद्दल टीका केली जाते. केंद्र सरकारने नुकतीच जातीय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. या घोषणेद्वारे भारतातील गुंतागुंतीच्या सामाजिक रचनेला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याचा आणि वंचित समाज, विशेषतः इतर मागासवर्गीयांसाठी (OBC) विशेष कल्याणकारी धोरणे तयार करण्याचा हेतू दिसून येतो. जरी लोकशाही चर्चा सामाजिक न्यायाच्या अजेंड्याने प्रभावित झाली असली तरी, वास्तव आणि केवळ घोषणांमध्ये एक मोठी दरी आहे.

अनुसूचित जाती आणि जमाती (SC/ST) यांना सत्ता आणि विशेषाधिकारांपासून सतत बाजूला ठेवले जात आहे. यामुळे त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या वचनबद्धतेबाबतीत राज्य आणि राजकीय उच्चभ्रूंचा किती सहभाग आहे, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. कमकुवत धोरणे आणि त्यांची असमान अंमलबजावणी यामुळे भारतात सामाजिक न्यायाची आमूलाग्र बदल करणारी कल्पना केवळ निवडणुकीपुरती एक घोषणा ठरली आहे. भारतीय संविधानाने अनुसूचित जाती आणि जमातींच्या (SC/ST) उन्नतीसाठी तीन मुख्य आधारस्तंभ दिले आहेत.

पहिला आधारस्तंभ म्हणजे 'एससी/एसटी अॅट्रोसिटी अॅक्ट' सारख्या तरतुदींद्वारे सामाजिक अवमान आणि शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे. यामुळे त्यांच्या सामाजिक सन्मानाची आणि नागरी हक्कांची सुरक्षा सुनिश्चित केली जाते. दुसरा आधारस्तंभ म्हणजे राज्य संस्थांमध्ये आरक्षणाद्वारे समान प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे, ज्यामुळे या समूहांना प्रशासनात महत्त्वाची पदे आणि विशेषाधिकार मिळतात. तिसरा आधारस्तंभ म्हणजे विशेष अंदाजपत्रकीय तरतुदी आणि धोरणात्मक उपक्रमांद्वारे आर्थिक सक्षमीकरण करणे. या विभागांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आर्थिक मदत सुनिश्चित करण्यासाठी राज्य अंदाजपत्रकात 'विशेष एससी/एसटी घटक योजना' सारख्या धोरणात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या होत्या.

तथापि, या तिन्ही आघाड्यांवर अंमलबजावणीमध्ये सातत्य नाही. अनेकदा ही केवळ प्रतिकात्मक मूल्ये ठरतात, ज्यामुळे या समाजातील मोठा वर्ग सामाजिक न्याय धोरणांच्या लाभापासून वंचित राहतो. एससी/एसटी (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यासारख्या कायदेशीर संरक्षणात्मक उपाययोजना असूनही, जातीवर आधारित भेदभाव अजूनही कायम आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोने (National Crime Records Bureau) २०२२ मध्ये एससी समुदायाविरुद्ध ५७,५८२ आणि एसटी समुदायाविरुद्ध १०,०६२ अत्याचारांच्या घटनांची नोंद केली आहे, जे खोलवर रुजलेल्या पद्धतशीर दडपशाहीचे प्रतिबिंब आहे. ग्रामीण भागांत, जिथे दलित केवळ सन्मानासाठी किरकोळ प्रयत्न करतात तरी त्यांच्यावर हिंसाचार होतो, तर शहरी केंद्रांमध्ये, जिथे घर आणि नोकऱ्यांमध्ये भेदभाव मोठ्या प्रमाणावर आहे, जाती अजूनही संधींवर परिणाम करत आहेत. या घटना प्रभावी संरक्षण उपायांची अंमलबजावणी करण्यात आलेले अपयश अधोरेखित करतात. राज्य संस्थांमध्ये एससी/एसटी प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी तयार केलेल्या आरक्षण धोरणात असमान प्रगती दिसून आली आहे.

रेल्वे आणि बँकांसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्समधील कनिष्ठ स्तरावरील पदे (ग्रुप सी आणि डी) अनेकदा भरली जातात, परंतु वरिष्ठ पदे मोठ्या प्रमाणात या वंचित समूहांसाठी पोहोचण्यायोग्य नाहीत. विशेषतः उच्च शिक्षणामध्ये, कुलगुरू आणि प्राध्यापक यांसारखी नेतृत्व पदे प्रामुख्याने खुल्या प्रवर्गातील व्यक्तींनी व्यापलेली आहेत, ज्यामुळे संरचनात्मक अडथळे समोर येतात. त्याचप्रमाणे, उच्च न्यायव्यवस्थेत न्यायाधीश आणि प्रमुख पदांवर एससी/एसटी यांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे, ज्यामुळे समान सहभागाचे आश्वासन कमकुवत होते. सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्सचे आकारमान कमी केल्याने आरक्षित पदांसाठीच्या संधी आणखी कमी झाल्या आहेत, ज्यामुळे आर्थिक बहिष्कार वाढत आहे. अनुसूचित जाती आणि जमातींसाठी असलेली विशेष घटक योजना, जी त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी बजेटमधील संसाधने वापरण्यासाठी आहे, ती अनेकदा एक प्रतिकात्मक कृती बनली आहे.

या निधीचा अनेकदा कमी वापर होतो किंवा तो दुसऱ्या ठिकाणी वळवला जातो आणि एकापाठोपाठ येणारी सरकारे या गटांच्या खऱ्या कल्याणासाठी या वाटपांना प्राधान्य देत नाहीत. केंद्रातील सध्याच्या भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नेतृत्वाखालील सरकारच्या काळात, ही प्रवृत्ती कायम राहिली आहे, सामान्य कल्याणासाठीच्या प्रमुख योजना (उदा. जन धन योजना) वंचित गटांसाठी असलेल्या विशेष कल्याणकारी योजना आणि धोरणांना झाकोळून टाकत आहेत. दलितांच्या असुरक्षित आर्थिक परिस्थितीची तपासणी करण्यासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरण व गतिशीलतेसाठी प्रभावी सार्वजनिक धोरणे सुरू करण्यासाठी नगण्य प्रयत्न होत आहेत.प्रतीकात्मकतेच्या पलीकडे, भविष्याचा मार्ग : भारताच्या निवडणूक राजकारणात सामाजिक न्याय हा एक प्रमुख आवाज बनत असताना, ठोस कृतीशिवाय त्याची परिवर्तनशील सामर्थ्य मर्यादित राहते. घटनात्मक संरचना मजबूत असली तरी, त्याला कार्यकारी उत्तरदायित्व आणि धोरणात्मक नवनिर्मितीद्वारे कठोर अंमलबजावणीची आवश्यकता आहे. राजकीय पक्षांनी केवळ लोकानुरंजक घोषणांच्या पलीकडे जाऊन सामाजिक न्यायाला एक मुख्य शासन अजेंडा म्हणून प्राधान्य दिले पाहिजे. भाजपने सामाजिक न्यायाला पाठिंबा देण्याचे वचन दिले असले तरी, त्यांच्या दशकभराच्या कार्यकाळात जातीय हिंसाचारात मोठी वाढ झाली आहे आणि एससी/एसटी उन्नतीसाठीच्या धोरणांना कमकुवत केले गेले आहे.

मात्र प्रतिकात्मक स्तरावर त्यांनी प्रमुख संकेत दिले आहे (उदा. द्रौपदी मुर्मू यांना देशाच्या राष्ट्रपती म्हणून निवडणे), परंतु सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या नवीन उपक्रमांचा अभाव आहे. सामाजिक न्यायावरील वाढती राजकीय चर्चा ही ठोस कार्यकारी आदेश आणि धोरणांच्या योग्य अंमलबजावणीला पूरक असावी. वंचित सामाजिक गटांची एक लोकप्रिय चळवळ आणि त्यांच्या एकत्रीकरणाशिवाय, राजकीय उच्चभ्रू त्यांच्या कल्याणासाठी प्रभावी कार्यक्रम राबवण्यास नेहमीच संकोच करतील. वंचित सामाजिक गटांची व्यापक चळवळ आणि संघटन (मोबिलायझेशन) उभी राहिल्याशिवाय, राजकीय उच्चभ्रू (elite) नेतेमंडळी त्यांच्या कल्याणासाठी प्रभावी योजना राबवण्यास नेहमीच मागेपुढे पाहतील वा टाळाटाळ करतील. परंतु, दलित आणि आदिवासींना राष्ट्रीय चर्चांमधून वाढत्या प्रमाणात बाजूला टाकल्यामुळे (बाहेर ठेवल्यामुळे), पारंपरिक उच्चभ्रूंना (traditional elites) निर्णय प्रक्रियेवर वर्चस्व गाजवता आले आहे आणि ते सामाजिक न्यायाच्या धोरणांकडे दुर्लक्ष करत आहेत. दलित आणि आदिवासींचे सामाजिक व राजकीय नेते एका मंचावर एकत्र येऊन, संविधानातील नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी देशात चर्चा (आवाज) उठवण्यात कमी पडले आहेत, हे उघडपणे दिसते. सामाजिक न्यायासाठी एक शक्तिशाली चळवळ दलित-आदिवासी स्वायत्ततेखाली एक मजबूत आणि ठाम नेतृत्व पुढे आणून त्यांच्या हक्कांसाठी लढा देण्याची आवश्यकता आहे.

या अशा परिस्थितीत, सामाजिक न्यायासाठी दलित आणि आदिवासींनी आपला आवाज मोठा करण्याची तातडीची गरज आहे. यामुळे धोरणात्मक सुधारणांसाठी एक राष्ट्रीय चर्चा सुरू करण्यासाठी नव्या चळवळींना मोठ बळ मिळेल. या उद्देशासाठी, दलित-आदिवासी स्वायत्ततेखाली एक शक्तिशाली सामाजिक न्याय चळवळ उभी करण्याची आणि या कार्याला पुढे नेण्यासाठी एक धाडसी व ठाम नेतृत्व पुढे आणण्याची आवश्यकता आहे.


**लेखक: प्रा. हरीश एस. वानखेडे,**
दलित प्रश्नांचे अभ्यासक, जेएनयू, नवी दिल्ली.
**अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे**, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना. पूर्व प्रसिद्धी : डेक्कन हेराल्ड, १९ सप्टेंबर २०२५

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ सप्टेंबर २०२५

# अर्धा कोयता : व्यथा वेदनेची सशक्त कथेची अभिव्यक्ती




"माझे जन्मगाव नालेवाडी आणि पंचक्रोशीतील गोरगरीब, कष्टकरी,मजूर,ऊसतोड कामगार स्त्रिया, पुरुष, तमाम जनतेस".. ही अर्पणपत्रिका श्रद्धेय ऋणाई व्यक्त करते.जालना जिल्ह्यातील नालेवाडी ता.अंबड येथील कवयित्री, कथाकार अलकनंदा घुगे -आंधळे यांचा 'अर्धा कोयता' हा कथासंग्रह अतिशय दमदार कथाबीज असलेल्या कथासंग्रह आहे.. उसतोडीला जोडीनं नवरा बायकोने जाणे म्हणजे पूर्ण कोयता अन् एकलीनं जाणं म्हणजे 'अर्धा कोयता'..सालो साल मराठवाड्यानं दुष्काळ भोगला.. ह्योच घोगला (फोड)घेऊन दमदार अभिव्यक्तीची कथा अलकनंदा घुगे यांनी अतिशय समर्थपणे मराठवाड्यातील जालनी बोलीभाषेतील शैलीने समृद्ध लिहिली आहे..समकाल आणि सामाज वास्तव,शेती मातीशी असलेलं कष्टकऱ्यांचं नातं आणि नाळ कायमच चारगाठ बांधवी तशी जोडली आहे..ते वास्तव आजही कायमचं काय आहे..कितीही कुटाड काम करा, या मुकादम अन् ठेकेदारांच्या जाळ्यात अडकलेला हा ऊसतोड कामगार,यांच्या घरादाराची, लेकराबाळाची दैना कायमच आहे.. उसाचे कारखाने, गंडुरी,बेनं,चिवटी,वाढे,कांडकं, पांचट,शिवळा,ज्योते, बैलगाडी,मोळी,खोपी,कोपी,झोपाटं,खोपटं, भगुणं, ताटवाटी, चऱ्हाट, उचल, थळ ,फड,अन् कुऱ्हाड कोयता.. हेऊसतोडणी वाल्याचं बिऱ्हाड. . बैलगाडीतून सारे ऊसमळे,थळा,फडातून, रातपहाट एक करून साऱ्या हंगामात,कारखान्याचा पट्टा पडुस्तोवर रानांत,बांधा- बंधुऱ्यावर राहायचं ही ऊसतोड कामगारांची चित्तरकथा.. ऊसतोडणीला बेलापूरला जाणं अन् ऊसतोड कामगारांच्या व्यथा, वेदनेचा हुंकार म्हणजे हा कथासंग्रह..बगीचा,या कथेत "अज्ञान आणि खानदानी आडमुठेपणामुळे हिरव्या गार बगीच्याचं वाळवंट झालं(पृष्ठ १७)..'नखऱ्या',या बैलांनं आपला जीव धोक्यात घालून चोरांपासून मालकाचं दागिने वाचवले..नखऱ्याच्या गळ्यात दागीन्याचं उपारण बांधलं होतं..नखऱ्याचं शिंग चोराच्या कुऱ्हाडीनं गेलं..नखऱ्या तर संपतो.पण पंचक्रोशीतील निल्या नावाची दहशत कायमची संपवतो (पृष्ठ २५)..'दंश'ही एक प्रचंड वेदना देणारी कथा,ऊस तोडणी करतांना सर्जाला सर्पदंश (पानं लागते)होतो.. फडातूनचं बैलगाडी दामटत नवऱ्याला दवाखान्यात घेऊन जाणारी त्याची बायको शारदी..डाॅक्टरला उशीर होऊन सर्जा मरतो..घोणसं अति विषारी 'सर्पदंशाने मृत्यू त्याचा मृत्यू होतो..ऊसतोड कामगारांच्या वाट्याला हे नित्याचं जीणं आहे..कथा लेखिका लिहिते, "पुरुषांच्या आधाराशिवाय स्त्री जगते,पण पावलों पावली असंख्य सर्प दंश करण्यासाठी टपलेले असतात"(पृष्ठ ३४)..'अफवेच पीक'.. गावं खेड्यातील हे पीक लय मांयदळ असते.."तुला म्हणून सांगते कुनाला सांगू नको?"अन् साऱ्या गावखुरी गावकोळपी साऱ्या गावाला सांगून बसते.."यातून या अफवेची वावटळ (वाठूळ) होते.."कुणी म्हणे इथं दिसला अन् कुणी म्हणे तिथे दिसला.आठ दिवस नुसत्या अफवांवर अन् थापावर चालू व्हतं.."या अफवांच्या पिकांनी शोधाची दिशाच भरकटली होती.. नाहीतर एक जीव वाचला असता.. किमान देहाची विटंबना झाली नसती"(पृष्ठ ४२)..ग्रामीण भागातील एकोप्याने राहणे, जातपात,धर्म पताका दुर ठेवणे.लहान मुलांचे भावविश्व 'ईद का चांद',मध्ये पाहिला मिळते.. 'छेड' या कथेत शालेय मुलांची पौगंडावस्थेतील स्थिती वेळीच आवर घातला नाहीतर आक्रीत घडते..पोरांनी छेड काढल्याने मुलींची शाळा बंद पडते..यावरून मोठ्या माणसात भांडणं लागतात.. एका मुलाला बेदममारहाण होऊन तो गाव सोडून पळून जातो ते कायमचा..अशी सखेद खंत करणारी कथा..तशी 'आळ' अबजाळ या शब्दाने ही एखाद्याचे हसते खेळते जगणे कसे दिड•मुढ होऊन जाते.. कारण माणूस चारित्र्य घेऊन जगायला आलेला असतो.."मंदीने घेतलेला खोटा आळ आणि संगीचा तिरस्कार या गोष्टी संपतला सहन झाल्या नाही.त्यांने गळफास लाऊन स्वतः संपवले होते"(पृष्ठ ७३)..ही कथा अतिशय उद्विग्न करून जाते..एखाद्या सरळमार्गी माणसाला आपल्यावरच आपल्या जवळच्यानी विश्वास ठेवू नये..'विम्याचे पैसे',प्रकाश एकुलता एक पोरगं,व्यसनी निघतं..बायको नांदत नाही..माय बाप जीवनाचं रान करून झुरू झुरू मरू लागलेत..उसणे पैसे आणून विमा भरायचा आहे.. वरूट्याखाली नोटा लपून ठेवल्यात ..तरी पिदाड्या पोरानं रातोरात पैशावर डल्ला मारला..अन् तिकडच फुफाट्यात पिवून पडलं..संगत्या सोबत्यान बी खिशातून पैसे चोरले..ही गावं खेड्यातील सर्व सामान्य कुटुंबातील व्यसनामुळे बर्बादी वाट्याला येते...'यशोदा'तील नायिका वृध्द म्हतारी..शेतीबाडी,मोठा वाडा.. अन् पुढे वाटण्या..म्हातारीच्याही वाटण्या होतात..सुनाचा जाच..घरात भांडणं..अन् मग यशोदाचं रातोरात वाट फुटेल तिकडे निघून जाणं..ती पोलीसाला सांगते, या दुनियेत तिचं कुणीच नाही..यशोदा वृध्दआश्रमात दाखल होते..या कथेचा आत्मा मन गहिवरून टाकतो..ज्याच्यासाठी कळा आणि अवकळा देऊन माता होते.पुढे तिला लाथा मिळतात..हे कुठले मातृत्वाचे संचित..'नकुशी',या कथेतून स्त्री मनाचा माया ममतेचा कोपरा उलगडा आहे.नकोशी ही सावत्र आईची मुलगी.ती नव्या आईला इतका जीव लावते की, तिची आईचं होते.. ती अनंत जन्माची माता होऊन जाते..आणि हे फक्त मुलगीच करून शकते.. शाळेत प्रवेश अर्जावर नकुशीचे नावं लिहिले 'नक्षत्रा' आणि आईचे नाव लिहिले तुळसा.."(पृष्ठ ९७) 'शिक्षा' कथेत पारधी बायका रात्री रानात कापूस चोरी करायला जातात..धुरी पोटूशी बाई तिला पळून जाताना पकडले जाते.. पारावर आणले लाथा बुक्याने मारले जाते..धुरी पाराजवळच बाळंत होते..गावातील भाम्मका तिला भाकर तुकडा खाऊ घालते.. कापसाच्या बोळयानं तान्ह्याला दूध पाजते..भूक,भाकर व यातना बाईच्या वाट्याला काटेरी भोग घेऊन येतात..'मंगळसूत्र'या कथेचा धागा अतिशय खडतर आहे.लग्नाची बायको असताना ही अजूनही गावखेड्यात दुसरीसाठी मनी मंगळसुत्र घेऊन देणारा पती घरच्या बायकोसाठी ही घेऊन येतो..आतारानं नजर चुकीन मनी ओवतांना तिचा एक ढोबळा मनी त्याच्या बायकोच्या मंगळसूत्रात येतो.ती घरी येऊन त्याला बदलुन आणा म्हणते तेंव्हा हे पितळ उघडं पडतं.. माणिक, चंद्री अन् आप्रूगी..हे जळणार दुःख आयुष्यात व्यापून जातं."आज तिचा खरा दागिना चंद्रीच्या सहवासात विसावल होत"(पृष्ठ ११२)शेतकऱ्यांनी कर्ज काढून ऊस लावावा.दिनरात त्याची मेहनत करून त्याला झोळणीतल्या लेकरागत सांभाळावं.. ऊसतोडीवाल्या मुकादमानं भीमाला तिनं हजार रूपये मागावं..बायकोनं गळ्यातलं मंगळसूत्र गहाण ठेवून पैसा आणावा..अर्धा उस फडात ठेवून तोडीवाले निघून जातात..तेव्हा कथेचा नायक भीमा उभा ऊस चेतवून देतो."सारेचं अल्पभूधारक दोन तिनं एकरावाले ऊसाचे फड पेटून द्यायला लागले..भाव कमी का मिळाना पण ऊसकारखान्याला गेल्याने पिकाला रानं मोकळं होतं होतं.(पृष्ठ १२०) 'शेवंता' कथेचा अनुबंध मनाला होरपळ टाकणारं आहे.वंशला दिवा ही आडमुठ्या चालीरिती आणि त्यातबाईचं बाळांत यातनेच मरण.त्यात मुलीचा गर्भपात.पिंढ्यानं पिढ्याची हा आत्मघातकी प्रथा.मुलगाचपाहिजे म्हणून दुसरं लग्न.'भेट'ही हृदय स्पर्शी कथा.गुरुजी वर्गात आई कविता तल्लीन होऊन शिकवतात.वैज्या आईची वाट पाहतो.बाजारचा दिवस येणाऱ्या बाईमध्ये आई बाजाराला आली असलंत्याचे वर्गात लक्षचं लागेना.गुरूजी शिक्षा करतात. जेगुरूजी यही माय येणारं हाये.मला मायेला भेटायला जायचं.कथेचा नायक वैज्या त्याचे आई बाबा ऊसतोडीला गेले.तो आजीजवळ राहतो.गुरूजी वैज्याला सायकलवर घेऊन सारे ऊसथळ पालथे घालतात.त्याच दिवशी वैज्याचे माय बापअपघातून वाचतात.माय लेकरांची भेट होते."पोलिसांनी आणि जमलेल्या लोकांमुळे दोघांचे प्राण वाचले होते"(पृष्ठ १३८) ही आग लय न्यारी.नव्या पिढीचे पोटे सोट्टे चोरून दारू मटन ख्यायला ढाब्यावर जायलेत.असंच गावातील चाठाळ पोट्टे, रम्या, पिंट्या अन् सुन्या गावखुरी जुन्या मोडक्या स्परात मटन शिजवताना आग लागते.छपरं जळते.पोऱ्हं पळून जातात.गावात आवाई जाते हे काहीतरी आक्रीत आहे.आज आमुश्या हाई.ही आग लागली कशी? शेवटपोत कळतं नाही.अंधश्रध्देवरप्रकाश टाकणारी ही उत्तम कथा आहे.कथा सशक्त झाली आहे.गाव शिवार ते ऊसतोड मजुरांच्या व्यथा वेदनेचा हुंकार या कथामधून जाणवतो.'अर्धा कोयता' म्हणजे नवऱ्याच्या जागेवर उस तोडीला जाणे.या कथेतील नायक उसाच्या मोळी डोक्यावर उचलून त्याच्या माने खालची शीर दबली.डोक्याला मुंग्या येऊ लागल्या.दवाखाना केला.तेवढ्या पुरतं बरं वाटलं.एक दिवस अर्धांगाचा झडका आला.दवाखान्याला मुकादमकुन उचल घेतली होती.पैसं फिटूस्तोर कांताना नवऱ्यासाठी म्या अर्धा कोयता घेऊन ऊसतोडीस जाते.एक दिवस अर्ध्या रात्री कांतावर अत्याचार करायला मुकादम येतो.ती एकटीच खोपीत असते.या जंतर कोयत्याने त्याला मांडीवर वार करते.तो पळून जातो.. भूक,कर्ज,शील,चारित्र्य, पतीवरची निस्सीम प्रेम भक्ती.खऱ्या रणरागिणीचे चित्रण या 'अर्धा कोयता' कथेतून दिसून येते.'वळहाई'या कथेचा आत्मा छोटा.पण आशय मोठा.काही कारागीराची ख्याती त्या त्यापरिसरात असते तशी आप्पा वळहाईच्या पेंढ्या अन् त्याची ठेवून एक नंबर कधीचं वळहाई ढसाळणार नाही की पेंढ्या निघणार नाही.एका दिवसात चार पाच वळहाईच काम तमाम करणारा आप्पा.वळहाई मालकाला फोन येतो आप्पाची आई सिरियस आहे.पाचवी शेवटची वळहाई.अन् आप्पाच्या आईनं लेकासाठी झाकड पडूस्तोवर जीव ठेवला.आप्पा घरी जातो तेंव्हा आईची मऊत निघालेली असते.अतिशय धक्का देऊन ही कथा जाते.काम कामाची कुशलता,या पेक्षा मायेच्या सावलीचीउब माणसाला उभी करते.इतकी संवेद कथा ही आहे.या कथासंग्रहाची पाठराखण ख्यातनाम जेष्ठ श्रेध्दय कथाकार बाबाराव मुसळे लिहितात "कथांची मांडणी निवेदन,सवांद, तिच्यातील प्रसंग-संघर्ष कथेची कलाटणी.माणसांच्या अंगची विकृती,व्यसन त्यांच्या जीवनात खळबळ निर्माण करतात आणि तेवढ्याने तो अस्वस्थ होतो.एकंदरीत कथेचा बाज अलकनंदा शाबूत ठेवून त्यांच्या कथा परिणामकारक झालेल्या आहेत"तर दस्तुरखुद्द लेखिका मनोज्ञ मनोगत व्यक्त करताना.माझ्या या लोकांची दैना पाहून मन गलबलून येते."मन उदास उदास,घेते वेदना ही झुला..खाई हेलकावे जीव,काय सांगू बये तुला...अतिशय उत्तम आशय संपन्न सृजन समर्पक कथा बीज अंकुरले आहेत.पुढील कथा लेखनासाठी शुभेच्छा.

**समीक्षक:-डॉ प्रभाकर शेळके,**
जालना

कथासंग्रह:-अर्धा कोयता
लेखिका:-अलकनंदा घुगे-आंधळे
प्रकाशक:-परिस पब्लिकेशन, पुणे
मुखपृष्ठ:-अरविंद शेलार
किंमत:-३५०